**नियमित दिवाणी दावा नं. २/२०१५**

सौ. शारदा तळेकर वि. जयवंत जामदार वगैरे

**निशाण नं. ९५/क**

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांची जबानी.**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

माझे नांव – रणजित बाळासो पाटील

वय – ४९ वर्षे

धंदा – नोकरी

राहणार – पन्हाळा, जि. कोल्हापूर

**<u>सरतपास वकील श्री.एम.एच.चावरे यांचेमार्फत शपथेवर सुरु,</u>**

१. मी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी पन्हाळा कार्यालय येथे उप. कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेतकऱ्यांना नदीवर तसेच विहीरीवर पाणी पुरवठा करण्यासाठी वीज पुरविली जाते. विहिरीवर विद्युत पुरवठा करण्याकरीता संबंधित अर्जदाराकडून वीज मागणी अर्ज, त्या जागेचा सातबारा उतारा, रहिवासी पुरावा , आधार कार्ड घेतले जाते. विद्युत वितरण कंपनीकडून वीज पुरवठा मंजूर करण्यात आल्यानंतर आम्ही त्याबाबतचे कोटेशन अर्जदार यांना देतो. त्यानंतर संबंधित अर्जदार यांनी कोटेशन रक्कम भरल्यानंतर त्याची पावती आम्ही अर्जदार यांना देतो. अर्जदार यांनी कंपनीमध्ये अनामत रक्कम भरल्यानंतर त्याची पावती आम्ही देतो व त्यानंतर संबंधित ठिकाणी वीज पुरवठा करण्याची व्यवस्था तयार झाल्यानंतर तेथे वीज पुरवठा सुरु केला जातो. शेती वीज पुरवठा प्रकारामध्ये दोन प्रकारे वीज पुरविली जाते. पहिला प्रकार म्हणजे मीटर वीज पुरवठा आणि दुसरा वीज प्रकार म्हणजे मीटरविना वीज पुरवठा. जर मीटर

बसविलेले असेल तर तेथे मीटरचे रिंडिग घेऊन वीज बील ग्राहकाला दिले जाते आणि मीटर विना वीज पुरवठा असेल तर त्या ठिकाणी वीज जशी खर्ची पडेल त्याप्रमाणे आकारणी करुन वीज बील दिले जाते. आता मला दाखविण्यात आलेले वसंत धोंडी जामदार यांचे वीज बील आहे. त्यांचा ग्राहक क्र. २६२६१०००१०६२ असा आहे. प्रस्तुत वसंत धोंडी जामदार यांचा वीज पुरवठा दि. १४.१२.१९७९ रोजी सुरु करण्यात आला. मला दाखविण्यात आलेले दि. २१.०७.२००८ रोजीचे वीज पुरवठयाचे संगणकीकृत बील आहे. मला दाखविण्यात आलेले दि. ०३.०५.२००८ रोजीचे वीज पुरवठयाचे संगणकीकृत बील आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. ९६ व नि. ९७** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेला वसंत धोंडी जामदार यांचा मार्च १९९८ ते सप्टेंबर २००७ असे ४ कझ्युमर पर्सनल लेजर संगणकीकृत उतारे आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यामुळे त्यास **नि.९८, नि. ९९, नि. १०० व नि. १०१** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. ०२.०२.२००९ रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा वसंत जामदार यांचाच नमूद आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. ०९.०५.२००९ रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा वसंत जामदार यांचाच नमूद आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. २४.०४.२०१० रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा वसंत जामदार यांचाच नमूद आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. २८.०७.२०१० रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा वसंत जामदार यांचाच नमूद आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. २१.०१.२०११ रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा वसंत जामदार यांचाच नमूद आहे. आता मला दाखविण्यात आलेले नथुबाई वसंत जामदार यांचे दि. २४.०४.२०११ रोजीचे संगणकीकृत वीज पुरवठयाचे बील आहे. त्यावर ग्राहक क्र. हा

वसंत जामदार यांचाच नमूद आहे. मी वर उल्लेखलेली वीज बिले ही आमच्या विद्युत वितरण कंपनी यांचेकडून संबंधीत ग्राहकांना पाठविण्यात आलेली आहेत. त्यातील मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यामुळे त्यास **नि.१०२ ते नि. १०७** देणेत येत आहे. वीज बील ग्राहकाने भरल्यानंतर त्याच्या पावत्या आम्ही संबंधित ग्राहकास देतो. आता मला दाखविण्यात आलेल्या दि. १३.०५.२००८ व २४.०१.२००८ या पावत्या माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे बरोबर आहेत. त्यावर संबंधित रोखपाल यांची सही आहे. त्यास **नि. १०८ व नि. १०९** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए.पी.पोवार यांचेमार्फत सुरु,**

२. हे म्हणणे खरे आहे की, या प्रकरणातील **नि. ४८** येथे हजर करण्यात आलेले उतारे हे संगणकीकृत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, संगणकीकृत उताऱ्यांसोबत सदरचे उतारे हे कोणी दिले याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील सर्व वीज बिले ही संगणकीकृत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरची बिले ही कोणत्या संगणकातून बनविण्यात आली व त्याची प्रिंट काढण्यात आली त्या संबंधित इसमाचे प्रमाणपत्र जोडलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, **नि. ९८** मधील दाखले हे कोणत्या संगणकामध्ये बनविण्यात आले तसेच संबंधित संगणक हा कोणत्या अधिकाऱ्याच्या ताब्यात होता व त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले नाही.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

सही/–

दि. ०७.०४.२०२५

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

पन्हाळा.

**नियमित दिवाणी दावा नं. २/२०१५**

सौ. शारदा तळेकर वि. जयवंत जामदार वगैरे

**निशाण नं. ११२/क**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी.</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नांव | – निवास पांडुरंग पाटील |
| वय | – ५६ वर्षे |
| धंदा | – नोकरी |
| राहणार | – शिरोली पुलाची पन्हाळा, जि. कोल्हापूर |

**<u>सरतपास वकील श्री.एम.एच.चावरे यांचेमार्फत शपथेवर सुरु,</u>**

१.मी सन १९९१–९२ पासून छत्रपती राजाराम सहकारी साखर कारखाना येथे नोकरी करत आहे. आमच्या कारखान्यामध्ये साखर उत्पादन करणे हा मुख्य व्यवसाय आहे. त्याकरिता आम्ही शेतकऱ्यांकडून उस आणतो. सदरच्या उसाची तोडणी ही कारखान्यामार्फत केली जाते. पहिल्यांदा आमच्याकडे उसाची नोंद केली जाते. उसाची नोंद केलयानंतर आम्ही त्या शेतकऱ्याला उस नोंद पावती देतो. (साक्षीदाराला नि. ४२/१३ ते २२ पर्यंत कागदपत्रे दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली कागदपत्रे ही आमच्या कारखान्याच्या पावत्या आहेत. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजूती प्रमाणे बरोबर आहे. त्या पावत्यांवर संबंधित शेतकऱ्याचे नाव नमूद आहे. तसेच त्यावर त्यावेळीच्या असलेल्या संबंधित लिपीक यांची सही आहे. सदर पावत्यास **<u>नि. ११३ ते नि. १२२</u>** देण्यात येत आहे. उस तोडणीवेळी आम्ही शेतकऱ्याला तोड चिठठी देतो. (साक्षीदाराला नि. ४२/२३ व ४२/२४ पर्यंत कागदपत्रे दाखविण्यात आली.)त्यातील मजकूर माझ्या

माहिती व समजूती प्रमाणे बरोबर आहे.  त्यावर त्यावेळीच्या फील्डमन यांची सही आहे. त्या पावत्यांवर संबंधित शेतकऱ्याचे नाव नमूद आहे. सदर पावत्यास **नि. १२३ आणि नि. १२४** देण्यात येत आहे. आमच्या कारखान्यासोबत करार केलेले संबंधित तोडणी वाहतूक यंत्रणा ही आम्हाला त्या शेतकऱ्यांकडचा उस आणूण पुरवते. उस कारखान्यात जमा झाल्यानंतर आम्ही त्याचे वजन करतो. त्यानंतर त्याची वजन पावती आम्ही तोडणी वाहतूक यंत्रणेला देतो. तसेच त्या पावत्या आम्ही संबंधित शेतकऱ्यांना देखील देतो. (साक्षीदाराला नि. ४२/२५ ते  ४२/७४ पर्यंत कागदपत्रे दाखविण्यात आली.)आता मला दाखविण्यात आलेली कागदपत्रे ही आमच्या कारखान्याच्या पावत्या आहेत. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजूती प्रमाणे बरोबर आहे. त्या पावत्यांवर संबंधित शेतकऱ्याचे नाव नमूद आहे. तसेच त्यावर त्यावेळीच्या असलेल्या संबंधित वजन काटा लिपीक यांची सही आहे. तसेच आम्ही त्या पावतीवर उसाचे वजन लिहितो. या पावत्यांवर देखील उसाचे वजन लिहिलेले आहे. सदर पावत्यास **नि. १२५ ते नि. १७४** देण्यात येत आहे. नंतर त्या पावत्या आमच्याकडील अकॉऊट विभागाला पाठविल्या जातात. त्यानंतर आमच्याकडील संगणकामध्ये वजनाप्रमाणे त्याची नोंद घेतली जाते. त्याची संगणकावर नोंद घेतल्यानंतर त्याबाबतचे बील हे आम्ही अदा करतो.  (साक्षीदाराला नि. १७६/३ ते १७६/७ पर्यंत कागदपत्रे दाखविण्यात आली.)आता मला दाखविण्यात आलेली कागदपत्रे ही आमच्या कारखान्याच्या उसाच्या वजन झाल्याबाबतच्या संगणकीकृत नोंदी आहेत. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजूती प्रमाणे बरोबर आहे. त्या नोंदीवर संबंधित शेतकऱ्याचे नाव नमूद आहे. तसेच त्या नोंदीवर  माझी तयार करणार म्हणून सही आहे. तसेच त्या नोंदीवर  चीफ अकॉटट आणि केन अकॉटट यांच्या सहया आहेत. त्यास **नि. १७७ ते नि. १८१** देण्यात येत आहे. उस आल्यानंतर पंधरवडा झाल्यानंतर त्याबाबतचे बील आम्ही अदा करतो. ते बील आम्ही संबंधित शेतकऱ्याच्या खात्यावर पाठविले जाते. (साक्षीदाराला नि. १७६/८ ते १७६/१२ पर्यंत कागदपत्रे दाखविण्यात आली.)आता मला दाखविण्यात आलेली कागदपत्रे ही आमच्या कारखान्याच्या उस उत्पादक शेतकऱ्याच्या बील लेजर नोंदी आहेत.

त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजूती प्रमाणे बरोबर आहे. त्या नोंदीवर संबंधित शेतकऱ्याचे नाव नमूद आहे. तसेच त्या नोंदीवर माझी तयार करणार म्हणून सही आहे. तसेच त्या नोंदीवर चीफ अकॅाटट आणि केन अकॅाटट यांच्या सहया आहेत. त्यास **नि. १८२ ते नि. १८६** देण्यात येत आहे. आता मला दाखविण्यात आलेली बीले ही त्या संबंधित शेतकऱ्याच्या खात्यावर जमा झालेली आहेत. (साक्षीदाराला नि. १७६/१ वरचे कागदपत्रे दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले कागदपत्र हे आमच्या कारखान्याने दिलेली पुरशीस आहे. त्या पुरशीसीनुसार मला आजरोजी कारखान्याच्या वतीने साक्ष देण्याकरिता अधिकार देण्यात आलेले आहेत. त्यावर आमचे कार्यकारी संचालक आणि व माझी सही आहे. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १८७** देण्यात येत आहे. (साक्षीदाराला नि. १७६/२ वरचे कागदपत्रे दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेले कागदपत्र हे आमच्या कारखान्याने संबंधित संगणकीकृत पावत्यांबाबत दिलेले ६५–ब प्रमाणपत्र आहे.तसेच त्या प्रमाणपत्रावर चीफ अकॅाटट आणि केन अकॅाटट यांच्या सहया आहेत. त्यावर हजर करणार म्हणून माझ्झी सही आहे. तसेच चीफ व केन अकॅाटट यांच्या सहया मी दैनंदिन कार्यभारातील असल्यामुळे मी ओळखतो. त्यातील मजकूर माझे माहिती व समजुती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि. १८८** देण्यात येत आहे. मला दाखविण्यात आलेल्या सर्व उसांच्या नोंद या आमच्या कारखान्यात नियमितपणे ठेवल्या जातात. त्या संबंधित नोंदी या इतर कोणीही त्रयस्थ व्यक्तींना मिळू शकत नाहीत तसेच त्या नोंदी आमच्या रेकॅार्ड विभागात साठवून ठेवल्या जातात.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. ए. पी. पोवार यांच्यामार्फत सुरु,**

२. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी हजर केलेले सर्व कागदपत्र हे संगणीकृत आहेत.हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी हजर केलेल्या सर्व दाखल्यांवर चीफ अकॅाटट व केन

अकॉटट यांच्या सहया आहेत. हे म्हणणे खरे नाही की, भारतीय पुरावा कायदा कलम ६५– ब बाबत मला ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कारखान्यात संगणक विभाग आहे. आमच्या कारखान्यात संगणक विभाग प्रमुख आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेले प्रमाणपत्र हे संगणक विभाग प्रमुख यांनी दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, उसाची शहा निशा न करता आम्ही उस पुरवठा करतो. त्या जमिनीबाबत आम्ही नोंदी घेतो आणि नंतर त्याबाबत बील तयार करतो. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी हजर केलेल्या पावत्यावर गट नंबर किंवा सर्वे नंबर लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी मी हजर केलेल्या पावत्यांवर कोणत्या सर्वे नंबरचा कोणता गट नंबर झाला अशी नोंद नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

सही/–

दि. ०७.०७.२०२५

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा.